**नालंदा विद्यापीठात दक्षिण-पूर्व आशियाई अभ्यास केंद्राचे उद्‌घाटन**

01 एप्रिल 2026

नालंदा विद्यापीठातील दक्षिण-पूर्व आशियाई अभ्यास केंद्राचे उद्‌घाटन 31 मार्च, 2026 रोजी परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव (पूर्व), श्री पी. कुमारन यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला नालंदा विद्यापीठाच्या भागीदार देशांचे राजदूत, उच्चायुक्त आणि प्रतिनिधी, विविध विद्यापीठांचे कुलगुरू आणि नालंदा विद्यापीठाचे प्राध्यापक उपस्थित होते.

2. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑक्टोबर 2025 मध्ये क्वालालंपूर मध्ये आयोजित 22व्या आसियान-भारत शिखर परिषदेदरम्यान नालंदा विद्यापीठात दक्षिण-पूर्व आशियाई अभ्यास केंद्र स्थापनेची घोषणा केली होती.

3. हवामान आणि सागरी अभ्यास, व्यापार, वारसा, सार्वजनिक आरोग्य, स्थलांतर, डिजिटल सहकार्य आणि आंतरराष्ट्रीय संबंध अशा दहा आंतरविद्याशाखीय संशोधन समूहांच्या आधारे बनलेले हे केंद्र, आसियान-भारत सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी योजना 2026-2030 साठी एक ज्ञान भागीदार म्हणून कार्य करण्याचे उद्दिष्ट ठेवते.

4. शैक्षणिक संशोधनाला बळ देऊन, धोरणात्मक सहभागाला पाठिंबा देऊन आणि सांस्कृतिक व नागरी संबंध अधिक दृढ करून, हे केंद्र भारत आणि दक्षिण-पूर्व आशिया दरम्यान दुव्याचे कार्य करेल.

नवी दिल्ली

01 एप्रिल 2026